(61)
दि-५५

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे-१६.
जा.क्र.झोपुप्रा/तां.४/प्र.क्र.१६५/झोपुआ/३३७६/१४.
दिनांक :- ९ / ८ /२०१४.

## झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे '**उपरोक्त अधिनियम**' असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरीता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो. - २००४ / प्र. क्र. - २१३ / झो. प. सु. -१ दि.३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतूदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करणेत आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजूरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये अ.क्र.१ व २ याठिकाणी नमूद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. पलाश रियलटर्स यांचेतर्फे आर्किटेक्ट श्री. जगदीश देशपांडे यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२५/०५/२००७ रोजी विनंती केलेली आहे. अनुसूचीमध्ये अ.क्र.१ व २ याठिकाणी नमुद केलेली मिळकत मे. पलाश रियलटर्स तर्फे भागीदार श्री. संजय नारायण जालान व श्री. अमित प्रमोद खिंवसरा यांनी हवल-१०/०४७२७/२००५ दि.२५/०७/२००५ चे नोंदणीकृत दस्तऐवजान्वये खरेदी केली असून मिळकतपत्रिकेवर फेरफार क्रमांक ६४९ अन्वये त्यांची नावे दाखल झालेली आहेत.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये अ.क्र. १ मध्ये नमुद केलेले क्षेत्र उपरोक्त अधिनियमाच्या कलम ४(१) नुसार गलिच्छ वस्ती क्षेत्र असलेबाबत सक्षम अधिकारी व महापालिका सहाय्यक आयुक्त (ग.व.नि.), पुणे महानगरपालिका यांनी आदेश निर्गमित केला असून तो महाराष्ट्र शासनाच्या दि.०६/०४/१९९५ रोजीच्या राजपत्रात पान क्र.६४६ वर प्रसिद्ध झालेला आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ११(१) अन्वये अनुसूचीमधील अ.क्र.१ वरील क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र' असलेबाबतचा आदेश सक्षम अधिकारी व नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी त्यांचे कार्यालयाकडील आदेश क्र.५३/११(१)/०१ दि.०५/११/२००३ रोजी निर्गमित केला असून तो दि.१३/११/२००३ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात, दि.१७/११/२००३ रोजीच्या महाराष्ट्र 'हेरॉल्ड' व दैनिक 'संध्यानंद' या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेत आला आहे.

आणि ज्याअर्थी, पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील उपरोक्त अधिनियमाच्या कलम ४ (१) अन्वये घोषित क्षेत्रे ही पुनर्वसन क्षेत्र असलेचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जा.क्र.झोपुप्रा/क.अ.तां./झोपुआ/२५७/२०१४. दि.१०/०२/२०१४ अन्वये घोषित केले असून उपरोक्त आदेश महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात भाग १, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, २० फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारी २०१४, चे राजपत्रात पृष्ठ क्रमांक २६, २७ व २८ वर प्रसिद्ध करणेत आलेला असलेमुळे अनुसूचीमध्ये नमुद केलेले अ.क्र. १ वरील क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र असलेचे घोषित झालेले आहे.

आणि ज्याअर्थी, उपआयुक्त विभागीय कार्यालय क्रमांक १, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी अनुसूचीमधील अ.क्र. १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील झोपडीधारकांची पात्रता निश्चित केलेली असून एकूण ५८ झोपडीधारकांपैकी पात्र निवासी झोपडीधारकांची संख्या ४४, पात्र बिगरनिवासी झोपडीधारकांची संख्या ०२ आहे. पात्र झोपडीधारकांपैकी ७०% झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसकास संमती दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमधील अ.क्र.१ याठिकाणी नमूद केलेल्या मिळकतीवरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन फा.प्लॉट क्र.३१३बी (सि.स.क्र.९२९बी) भांबुर्डा, पुणे या मिळकतीच्या १६०७ चौ.मी. क्षेत्रावर करणेचे अनुषंगाने फा.प्लॉट क्र.३१३बी (सि.स.क्र.९२९बी) भांबुर्डा, पुणे या मिळकतीच्या १६०७ चौ.मी. क्षेत्राकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि.११/१२/२००८ च्या मंजुर नियमावलीच्या विशेष नियम १० (२) अन्वये व उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ क (१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश दि.०६/०३/२०१० रोजी निर्गमित करणेत येऊन तो दि.१८/०३/२०१० रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात, दैनिक लोकसत्ता व कातिल या स्थानिक वर्तमानपत्रात दि.०८/०३/२०१० रोजी प्रसिद्ध करणेत आलेला आहे. तथापि या आदेशाचे अनुषंगाने मा.स्लम ट्रिब्युनल, मुंबई येथील न्यायालयात दाखल झालेल्या ७/२०१० या अपिलामध्ये अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे व प्रस्तुत मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे विकसक यांनी

अनुसूचीमध्ये अ.क्र.१ याठिकाणी नमूद केलेल्या मिळकतीवरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन अनुसूचीमध्ये अ.क्र.१ याठिकाणी नमूद केलेल्या मिळकतीवरच करणार असलेबाबत दि.०६/०५/२०१३ रोजी मा.स्लम ट्रिब्युनल, मुंबई यांचे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केलेमुळे व अनुसूचीमध्ये अ.क्र.१ याठिकाणी नमूद केलेल्या मिळकतीवरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन अनुसूचीमध्ये अ.क्र.१ याठिकाणी नमूद केलेल्या मिळकतीवरच करणार असलेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांनी मा.स्लम ट्रिब्युनल, मुंबई यांचे न्यायालयात कथन केलेमुळे मा.स्लम ट्रिब्युनल, मुंबई यांनी अपिल क्र.७/२०१० मध्ये दि.२९/१०/२०१३ रोजी आदेश निर्गमित केलेले आहेत. सबब मा.स्लम ट्रिब्युनल, मुंबई येथील न्यायालयात दाखल केलेल्या अपिल क्र.७/२०१० चे अनुषंगाने फा.प्लॉट क्र.३१३बी, (सि.स.नं.९२९बी) चे एकूण १६०६ चौ.मी. क्षेत्र प्रस्तुत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून वगळणेत येत आहे. किंबहुना दि.०६/०३/२०१० रोजीचा आदेशच रद्द करणे क्रमप्राप्त असलेमुळे तो रद्द करुन पुढीलप्रमाणे नव्याने झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश निर्गमित करणेत येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या अ.क्र.१ मधील क्षेत्र 'गलिच्छ वस्ती क्षेत्र' म्हणून घोषित झाले असून या क्षेत्रालगत अनुसूचीमध्ये अ.क्र. २ मध्ये नमुद केलेले क्षेत्र हे बोजाविरहीत, झोपडपट्टीमुक्त खुले क्षेत्र असून ते विकसकाच्या मालकीहक्काचे आहे. अनुसूचीमध्ये नमुद केलेले अ.क्र.१ व २ वरील क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुर नियमावलीच्या विशेष नियम १०(२) प्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची संयुक्त योजना राबविणेकरीता मंजुरी मिळावी अशी विनंती विकसकाने केल्याने व अनुसूचीमधील अ.क्र. १ वर नमुद केलेले क्षेत्र वर नमुद केलेप्रमाणे यापुर्वीच पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित झालेने अनुसूचीमध्ये नमुद केलेले अ.क्र.२ वरील बोजाविरहीत खुले क्षेत्र सुद्धा मंजुर नियमावलीच्या विशेष नियम १०(२) अन्वये संयुक्त योजना राबविणेकरीता उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) अन्वये पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणे आवश्यक असलेबाबत खात्री झालेली आहे. अनुसूचीमध्ये नमुद केलेले अ.क्र.२ वरील क्षेत्र हे जरी अधिनियमाच्या कलम ३क(१) अन्वये पुनर्वसन क्षेत्र म्हणून जरी घोषित केले तरी अनुसूचीमध्ये अ.क्र.१ याठिकाणी नमूद केलेल्या मिळकतीवरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन मात्र अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या अ.क्र. १ याठिकाणी म्हणजेच घोषित क्षेत्रावर (INSITU) करणेत येणार आहे.

त्याअर्थी, मी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ३क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचीमध्ये अ.क्र.२ मध्ये नमुद केलेले ११७७.६४ चौ.मी. क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झालेपासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या कलम ३क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| अ. क्र | जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ. मी.) | चतु:सिमा (नगरभूमापन अधिकारी क्र.१, पुणे यांचे कार्यालयाकडील नभू१/पभु३/अतिसत्वर/मो.र.नं.६५६२/०८ दि.११/०३/२००८ रोजीच्या मोजणी नकाशाच्या 'क' प्रतीवरुन) |
|---|---|---|---|
| १ | फा.प्लॉ. क्र. ५६०, भांबुर्डा, पुणे. | २२०३ चौ.मी. (घोषित क्षेत्रापैकी रस्त्याकरीता संपादीत करणेत आलेले क्षेत्र वगळुन) | पुर्व :- लागु फा.प्लॉट क्र.५५१+५५२/४, लागु फा.प्लॉट क्र.५५१+५५२/५, रस्ता. |
| | | | पश्चिम :-लागु फा.प्लॉट क्र.५६० चे उर्वरीत क्षेत्र व रस्ता. |
| | | | उत्तर :- लागु फा.प्लॉट क्र.५५९. |
| | | | दक्षिण :- लागु फा.प्लॉट क्र.५६१ व ५६१/२/८. |
| २ | फा.प्लॉ. क्र. ५६०, भांबुर्डा, पुणे. | ११७७.६४ चौ.मी. (अघोषित क्षेत्रापैकी रस्त्याकरीता संपादीत करणेत आलेले क्षेत्र वगळुन) | पुर्व :- फा.प्लॉट क्र.५६० चे घोषित क्षेत्र. |
| | | | पश्चिम :- रस्ता. |
| | | | उत्तर :- फा.प्लॉट क्र.५६० चे घोषित क्षेत्र. |
| | | | दक्षिण :- लागु फा.प्लॉट क्र.५६१. |

सदर योजनेसंबधीची सर्व कागदपत्रे संबंधीतांना पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- ९ / ८ /२०१४.

(विकास देशमुख)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

F:\Nirmulan adesh doc 8